मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राज्यातील वैद्यकीय सेवेत महापालिका द्वितीय

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे दुसरे स्थान : महापालिका आयुक्तांकडून वैद्यकीय विभागातील कर्मचाऱ्यांचे कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

रुग्णांना उत्तम वैद्यकीय सेवा व सुविधा दिल्याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाला आरोग्य सेवेत राज्यात द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या उत्तम दर्जाच्या सेवा सुविधांमुळे वैद्यकीय सेवेत महाराष्ट्र राज्यात पिंपरी चिंचवड महापालिका दुसऱ्या क्रमांकावर आल्याबद्दल आयुक्त शेखर सिंह यांनी वैद्यकीय विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. ही बाब उल्लेखनीय असून नागरिकांना देण्यात येणाऱ्या दर्जेदार सेवांमध्ये वैद्यकीय विभागाने तप्तर राहून हा क्रम अग्रस्थानी न्यावा, असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या वतीने राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आरोग्य कार्यक्रमांतर्गत सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणात बालक, कुटुंब नियोजन, डेंग्यू, एचआयव्ही आणि इतर आजारांबाबतचे कार्यक्रम राबविणे, महापालिकेकडून वैद्यकीय सेवेसाठी करण्यात येणारा वित्त पुरवठा तसेच रूग्णालये व दवाखान्यात रूग्णांवर करण्यात येणारे उपचार सेवा आदी निर्देशांकानुसार वर्गीकरण करून गुण देण्यात आले आहेत. त्यात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने दुसरे स्थान मिळवले आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून नागरिकांना चांगल्या दर्जाची उपचार सेवा दिली जात आहेत. तसेच, केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य कार्यक्रमांची उत्तम प्रकारे अंमलबजावणी केली जात आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने सर्वाधिक गुण मिळवित राज्यात दुसरे स्थान प्राप्त केले आहे.



### आरोग्य कार्यक्रमांची उत्तम प्रकारे अंमलबजावणी

» महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून नागरिकांना चांगल्या दर्जाची उपचार सेवा दिल्या जात आहेत. तसेच, केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य कार्यक्रमांची उत्तम प्रकारे अंमलबजावणी केली जात आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने सर्वाधिक गुण मिळवित राज्यात दुसरे स्थान प्राप्त केले आहे.

"शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाची वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हावी, गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळावेत यासाठी महापालिकेने काही रुग्णालये सुरू केली आहेत. तेथे उत्तम दर्जाच्या सुविधा माफक दरात देण्यासाठी महापालिकेचे डॉक्टर व कर्मचारी प्रयत्नशील आहेत. यामध्ये गरजेनुसार वाढ करण्यात येत आहे. महापालिका रुग्णालयांतील सेवेमुळे रूग्ण तसेच, नागरिक समाधानी असल्याचे चित्र आहे.

- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.

# अपुऱ्या शिवभोजन थाळी केंद्रांचा गरिबांना फटका, पाच वर्षात केंद्राच्या संख्येत एकही वाढ नाही

## कामगार संख्येच्या तुलनेत शिवभोजन थाळी केंद्रांची संख्या कमी, सध्या शहरात 18 शिवभोजन थाळी केंद्र सुरु आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात ठाकरे सरकारच्या काळात सुरु झालेली 'शिवभोजन योजना' महायुती सरकारच्या काळातही जोमात सुरू आहे. मात्र, कामगार संख्येच्या तुलनेत 'शिवभोजन थाळी केंद्रांची संख्या कमी आहे. सध्या शहरात १८ शिवभोजन थाळी केंद्र सुरू आहेत. गेल्या पाच वर्षात केंद्राच्या संख्येत वाढ झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, विद्यार्थी-कामगारांना थाळी मिळत नसल्याचे चित्र आहे.

शहरातील १८ केंद्रांवरून १ हजार ७०० शिवभोजन थाळ्यांचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार गेल्या वर्षभरात सुमारे २० हजार ४०० जणांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. शहरात शिवभोजन केंद्रांच्या संख्येत वाढ करण्याची मागणी आहे. मात्र या केंद्रांना मंत्रालय स्तरावरूनच मान्यता दिली जाते. त्यामुळे नव्याने किती केंद्रांना मान्यता मिळालेली आहे, ही माहिती परिमंडळाकडून उपलब्ध होण्यास अडचण येत आहे. लाभार्थी संख्येच्या तुलनेत मंजूर शिवभोजन थाळींची संख्या कमी असल्याचे प्रकर्षाने जाणवते.




### या कारणांमुळे नाकारले जाते अनुदान

» बार नोंदवलेले, सीसीटीव्हीत चित्रित न झालेले ग्राहक, मोबाईल नंबर नोंदवला नसल्यास, छायाचित्र धूसर असणे, छायाचित्र अॅपमध्ये अपलोड नसणे, लक्षांकापेक्षा (थाळी संख्या) अधिक थाळ्या होणे, अशा विविध कारणांसाठी अनुदान नाकारले जाते.

### आकडे बोलतात

| » थाळी केंद्र | केंद्र संख्या | थाळींची संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| 'अ' परिमंडळ (चिंचवड) | ११ | ११२५ | ११२५ |
| 'ज' परिमंडळ (पिंपरी) | ६ | ४७५ | ४७५ |
| 'फ' परिमंडळ (भोसरी) | २ | २०० | २०० |

"शिवभोजन केंद्र संख्येत वाढ करण्याची मागणी करण्यासाठी थेट शासनस्तरावर अर्ज करण्यात येत आहेत. आमच्या स्तरावरील कुठलेच अर्ज प्रलंबित ठेवण्यात आलेले नाहीत.

- प्रशांत खताळ, अन्नधान्य वितरण अधिकारी

# मुसळधार पावसानंतर उखडलेल्या रस्त्यांवर मलमपट्टी सुरु

## शहरात सर्वत्र ठिगळांवर पुन्हा ठिगळं लावण्याची वेळ, पथ विभागाच्या निष्कृट कामाचे पितळ उघडे

**पुणे | प्रतिनिधी**

शहरासह उपनगर भागात पावसाने दमदार हजेरी लावली. यामुळे शहराची दैना उडाली आहे. रस्त्यावर नुकतेच नव्याने टाकण्यात आलेले डांबर उखडले असून खड्डे पडले आहेत. तसेच यापूर्वी रस्त्यावर पॅच मारून ठिगळे लावण्यात आली होती. त्याच ठिगळांवर आता खड्डे पडल्याने त्यावर पुन्हा ठिगळे लावण्याची वेळ महापालिकेवर आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

महापालिकेच्या पथ विभागाने यंदा चांगले रस्ते पुणेकरांना देणार असल्याचा दावा केला होता. मात्र या दाव्याचा विसर पथ विभागाला पडला असल्याचे दिसून येत आहे. गुरुवारी (दि. २५) शहरात तब्बल ११४.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे पुणे महापालिकेच्या पथ विभागाने केलेल्या निष्कृट दर्जाच्या कामाचे पुन्हा एकदा पितळ उघडे पडले आहे.




### खड्डे बुजवण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी एक कोटी रुपये

» शहरातील १२ मीटरपेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीचे काम महापालिकेच्या रस्ते विभागाच्या मुख्य विभागामार्फत केले जाते. १२ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते क्षेत्रीय कार्यालयामार्फत बांधून त्यांची देखभाल केली जाते. शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाने १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याद्वारे रस्त्यांवरील खड्डे दूर करण्यात आल्याचे रस्ते विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र, हजारो खड्डे खरोखरच दुरुस्त झाले असतील तर रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण का कमी होत नाही, असा प्रश्न नागरिकांकडून तसेच वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील रस्त्यांवर खड्डे पडलेल्या ठिकाणी पथ विभागाने पॅच मारले होते. त्यामुळे समतल रस्त्याच्या मधेच उंचवटे तयार झाले होते. त्यानंतर आता पुन्हा याच पॅचवर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे मागचे दिवस पुन्हा पुढे आल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे. मुसळधार पावसात महापालिकेचे रस्ते तग धरत नसल्याचे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. ठेकेदारांनी केलेल्या निष्कृट दर्जाच्या कामाचे दर्शन आता होऊ लागले आहे. त्यामुळे पावसाळ्यात दरवर्षीप्रमाणे शहरातील पडलेल्या खड्ड्यांमधून रस्ता शोधत त्यातून मार्ग काढण्याची वेळ वाहनचालकांवर आली आहे.

शहरासह उपनगर भागात पावसाने दमदार हजेरी लावली. यामुळे शहराची दैना उडाली आहे. रस्त्यावर नुकतेच नव्याने टाकण्यात आलेले डांबर उखडले असून खड्डे पडले आहेत. तसेच यापूर्वी रस्त्यावर पॅच मारून ठिगळे लावण्यात आली होती. पुणे महापालिकेने शहरातील तब्बल ७,२८३ खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. मात्र अद्यापही उपनगरातून शहरांना जोडणाऱ्या रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने वाहनचालकांचे कंबरडे मोडत आहे.

### सव्वा वर्षात 7,283 खड्डे बुजवले

» रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत पुणे महापालिकेने सात हजाराहून अधिक खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. १ मार्च २०२३ पासून शहरात एकूण ७,२८३ खड्डे बुजविल्याचा दावा महापालिकेने केला आहे. मात्र बुजवलेले खड्डेच पुन्हा उखडले आहेत की नव्याने खड्डे तयार झाले आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे. आता पुणे महापालिकेला खड्डे बुजविण्यासाठी पुन्हा पैसे खर्च करावे लागणार आहेत.

> महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांकडून त्या त्या भागातील खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे. काही ठिकाणी पॅच मारलेल्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. नव्याने खड्डे तयार झाले आहेत. ते तत्कळ बुजवले जात आहेत.
>
> **- साहेबराव दांडगे, अधीक्षक अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका**

# खेडकर कुटुंबाचा नवा कारनामा? बारामतीत जमिनीच्या सातबारावरील नावात दुरुस्ती

## पूजा खेडकरच्या कुटुंबियांनी बारामती तालुक्यात जमीन खरेदी केली असल्याची माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती

**पुणे | प्रतिनिधी**

पूजा खेडकरच्या कुटुंबियांनी बारामती तालुक्यात जमीन खरेदी केली असल्याची माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती. आता त्या सातबारावरील नावात दुरुस्ती करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दिलीप धोंडीबा खेडकर ऐवजी दिलीप कोंडिबा खेडकर असा नावात बदल करण्यात आलेला आहे. दिलीप खेडकर यांनी 14 वर्षांपूर्वी 14 गुंठे जमीन बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे खरेदी केलेली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती. बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे दिलीप खेडकर यांची ही जमीन विक्री करायची असल्याने त्या ठिकाणी खेडकर कुटुंबियांनी तसा बोर्ड लाऊन जमीन विकायला काढली आहे. दीड कोट इतकी जमीनीची किंमत असल्याचे सांगितले जात आहे.



### पूजा खेडकर गेली कुठे?

» पूजा खेडकर कुठे आहे हा प्रश्न आता वेगवेगळ्या तपास यंत्रणांना पडला आहे. यू.पी.एस.सीने प्रशिक्षण थांबवल्यानंतर पूजा खेडकर वाशीम मधून निघाल्यावर कुठे गेली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दिल्ली पोलिसांनी तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, खरा पण ती अद्याप दिल्ली पोलिसांना भेटलेली नाही.

वाघळवाडी ग्रामपंचायत हद्दीत गट क्रमांक 8 मध्ये दिलीप खेडकर यांच्या नावावर जमीन आहे. पण यामध्ये नवीन माहिती समोर आली आहे. वाघळवाडी येथे असलेल्या खेडकर यांच्या 7/12 वरती नावाची स्पेलिंग दुरुस्ती असा बदल करण्यात आली आहे. दिलीप धोंडीबा खेडकर ऐवजी आता नवीन नाव दिलीप कोंडिबा खेडकर असा नावात बदल करण्यात आला आहे. वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या खेडकर कुटुंबातील सदस्यांवर चौकश्याचा ससेमिरा लागला असताना 7/12 वरील नोंद दुरुस्त केल्याने अगोदर नावांचा घोळ समोर आला असताना आता नव्याने 7/12 वरील नाव बदल्याने दिलीप कोंडिबा खेडकर? आणि दिलीप धोंडीबा खेडकर? कोण की एकच व्यक्ती आहेत असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पूजा खेडकर यांचे बारामती कनेक्शन

» पूजा खेडकरचं बारामती कनेक्शन समोर आलं होतं. पूजा खेडकरच्या कुटुंबीयांनी बारामती तालुक्यात जमीन खरेदी केली असल्याचं माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली आहे. बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे दिलीप खेडकर यांची 14 गुंठे जमीन असल्याचं ट्वीट विजय कुंभार यांनी केलं आहे. वाघळवाडी ग्रामपंचायत हद्दीत गट क्रमांक 8 मध्ये दिलीप खेडकर यांच्या नावावर 14 गुंठे जमीन आहे. ही जमीन त्यांनी 2010 ते 2011 च्या दरम्यान खरेदी केली असल्याचं बोललं जातं आहे. दिलीप खेडकर यांची बारामतीतील वाघळवाडी येथे जमीन असल्यानं खेडकर यांचं बारामती कनेक्शन समोर आलं आहे.

# प्राप्तिकर विवरणपत्रे नव्हे; तांत्रिक अडचणींचा 'भरणा'

## प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळ आणि सर्व्हरमध्ये कर विवरणपत्रे भरताना करदात्यांना असंख्य तांत्रिक अडचणींची शर्यत पूर्ण करावी लागत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिन्याभरापासून प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळ आणि सर्व्हरमध्ये कर विवरणपत्रे भरताना करदात्यांना असंख्य तांत्रिक अडचणींची शर्यत पूर्ण करावी लागत आहे. त्यामुळे, सनदी लेखापाल, कर सल्लागारांसह करदात्यांच्या डोक्याचा ताप वाढला आहे. ऑनलाइन विवरणपत्र दाखल करण्याची ३१ जुलैअखेरपर्यंत मुदत असल्याने हे दिव्य पार पाडण्यासाठी सर्वांची धावाधाव चालू आहे.

प्राप्तिकर खात्याने जाहीर केलेली कालमर्यादा संपल्यानंतर विवरणपत्र दाखल केल्यास प्राप्तिकर कायद्याच्या अंतर्गत व्याजासह दंडही आकारला जातो. त्यामुळे, कारवाई आणि नाहकचा मनस्ताप टाळण्यासाठी शक्यतो वेळेच्या आत कर विवरणपत्रे भरण्याकडे सर्व करदात्यांचा प्रयत्न असतो.

प्राप्तिकर विवरणपत्र (ITR) हा असा एक फॉर्म आहे, ज्यामध्ये प्रत्येक पात्र निवासी/अनिवासी व्यक्तीने आर्थिक वर्षात मिळविलेली त्याच्या उत्पन्नाची कमाई आणि त्यावर देय असणाऱ्या व प्रत्यक्षात भरलेल्या प्राप्तीकरासंबंधीची परिपूर्ण माहिती प्राप्तिकर विभागाकडे दाखल करण्यासाठी वापरला जातो. एका आर्थिक वर्षात कोणतेही उत्पन्न मिळवणाऱ्या पात्र करदात्यांनी हा फॉर्म दरवर्षी सादर करणे बंधनकारक आहे. या विवरण पत्रात पगार, व्यवसाय वा धंद्यातील नफा, स्थावर मालमत्तेमधून मिळणारे जागा/घर भाडे उत्पन्न, लाभांश, भांडवली नफा, गुंतवणूक वा बँका खात्यावरील तसेच मुदत ठेवींवरील व्याज किंवा दिर्घ वा अल्पकालीन भांडवली नफा तसेच इतर स्रोतांमधून मिळालेले उत्पन्न येऊ शकते. दरवर्षी सदर व्यक्तीने विशिष्ट तारखेपर्यंत त्यांचे प्राप्तिकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे. याखेरीज सर्व कंपन्या, भागीदारी संस्था, मर्यादित जबाबदारी असलेली भागीदारी म्हणजे एलएलपी, स्थानिक प्राधिकरणांनी उत्पन्न असो वा नसो, हे विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.




### तीन दिवसांत विवरणपत्रे भरणा अशक्य

» प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर फाइल अपलोड करतेवेळी समस्या निर्माण होत आहे. सततच्या तांत्रिक अडचणींमुळे विवरणपत्र अंतिम तारखेच्या आत भरणे शक्य वाटत नाही. सर्व अडथळे आणि अडचणींचा विचार करता प्राप्तिकर खात्याने कर विवरणपत्र दाखल करण्याची ३१ जुलैही अंतिम तारीख पुढे ढकलून किमान एक महिन्याची मुदत वाढ द्यावी. तसेच सर्व तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशी सनदी लेखापाल, कर सल्लागारांसह करदात्यांची मागणी आहे.

### संकेतस्थळावर असंख्य त्रुटी

» उगाच जोखीम नको म्हणून इतर महत्त्वाची कामे सोडून प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही सनदी लेखापाल, कर सल्लागारांसह करदाते हे प्राप्तिकर विवरणपत्रे भरण्याच्या कामात गुंतलेले दिसत आहे. मात्र, गेल्या महिनाभरापासून त्यांना प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर अनेक तांत्रिक अडचणी व त्रुटींचा सामना करावा लागत आहे. धो धो पडणाऱ्या पावसामुळे चालू असलेला विजेचा लपंडाव, कासवगतीने चालणारे इंटरनेट तसेच पावसामुळे कार्यालयात ये-जा करण्यासाठी येणाऱ्या अडचणी आणि त्यात सर्व्हर नीट चालत नसल्यामुळे त्यांच्या डोक्याचा ताप वाढला आहे.

> प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर अनेक तांत्रिक अडचणी आहेत. बऱ्याच वेळा संकेतस्थळ उघडत नाही. विवरणपत्र दाखल करताना ओटीपी येत नाही. कधी नेटवर्क नसते; तर कधी सर्व्हर डाऊन असतो. साधारणतः महिन्याभरापूर्वी भारतीय सनदी लेखापाल संस्थेने केंद्रीय आयकर विभागाला ३१ जुलैची अंतिम तारखेची मुदत वाढविण्यासंदर्भात दिलेले आहे. मात्र, त्यास अद्यापही प्रतिसाद मिळलेला नाही.
>
> - उपेंद्र खोल्लम, कर सल्लागार, तळेगाव दाभाडे

> प्राप्तिकर खात्याचे संकेतस्थळ अतिशय मंदगतीने चालत आहे. वार्षिक सूचना विवरण (एआयएस) आणि करदाता सूचना विवरण (टीआयएस) अवचयन अर्थात डाऊनलोड करताना अडचणी येत आहेत. ओटीपी तयार होत नाही. कलम ८७ अ अंतर्गत रिबेट संबंधी समस्या आहेत.
>
> - स्वानंद आगाशे, सनदी लेखापाल, तळेगाव दाभाडे

# ऑनलाइन पद्धतीने धान्यवाटपात नेटवर्क 'आउट ऑफ रेंज'

## ई पॉस मशिनला पावसाळा असल्यामुळे नेटवर्क मिळत नाही, परिणामी, स्वस्त धन्य दुकानदारांना धान्याचे वाटप करताना अडचणी येत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

ई पॉस मशिनला पावसाळा असल्यामुळे नेटवर्क मिळत नाही. परिणामी, स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे वाटप करताना अडचणी येत आहेत. पावसाळा संपेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने धान्यवाटप करण्याच्या परवानगीसाठी दुकानदार संघटना आग्रह धरत आहेत. मात्र, अद्याप शासनस्तरावर त्या बाबत निर्णय झाला नाही. परिणामी, शिधापत्रिकाधारक आणि दुकानदारांमध्ये वादावादीचे प्रसंग उद्भवत आहेत.

अन्न धान्य वितरण व पुरवठा कार्यालयाच्या वतीने स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वाटपासाठी धान्याचा पुरवठा केला आहे. त्यानुसार दुकानदार धान्याचे वाटप करत आहेत. मात्र, सध्या ई-पॉस मशिनमधील तांत्रिक अडथळ्यांमुळे धान्य वाटपात अडथळे येत आहेत. शहरात विविध ठिकाणी धान्यवाटप सुरू आहे. ऑनलाइन आणि सध्या बोटांचे ठसे घेऊन धान्य देण्यात येते. ई केवायसी देखील दुकानदार करत आहे. पावसामुळे धान्य वाटपात व्यत्यय येत आहे. नेटवर्क नसल्यामुळे शिधापत्रिकाधारकाला किती धान्य द्यायचे या बाबत दुकानदारांना ई-पॉस मशिनवर माहिती मिळेना झाली आहे. त्यामुळे धान्यवाटप करता येत नाही. त्याबाबत शिधापत्रिकाधारक जाब विचारत आहेत. अनेक वेळा वादावादी देखील होत आहे. त्यामुळे पावसाळ्यात ही समस्या निर्माण होत आहे. पावसाळा संपेपर्यंत ऑफलाइन पद्धतीने धान्यवाटप करू देण्याची मागणी दुकानदार करत आहेत. त्यानंतर पूर्ववत इनलाइन प्रणालीने धान्य वाटता येईल, असे संघटनांचे मत आहे. मात्र, याबाबत शिधापत्रिका कार्यालयाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.



> पावसाळा असल्यामुळे रेशन दुकानदारांना नेटवर्कच्या अडचणी जाणवत आहेत. धान्यवाटप करताना सर्व्हर डाउनची समस्या उद्भवत आहे. अनेकदा लाभार्थ्यांना त्याची वाट पहावी लागते. त्यामुळे वादावादीचे प्रसंग निर्माण होत आहेत. सरकारने चार महिन्यांसाठी ऑफलाइन पद्धतीने धान्य वाटपास परवानगी द्यावी. यापुढील काळात जास्तीत जास्त लोकांना ऑनलाइन अर्ज करण्याची सक्ती करावी.
>
> - विजय गुप्ता, खजिनदार, ऑल महाराष्ट्र फेरप्राईज शॉपकिपर्स असोसिएशन

> शिवभोजन केंद्र संख्येत वाढ करण्याची मागणी करण्यासाठी थेट शासनस्तरावर अर्ज करण्यात येत आहेत. आमच्या स्तरावरील कुठलेच अर्ज प्रलंबित ठेवण्यात आलेले नाहीत.
>
> - प्रशांत खताळ, अन्नधान्य वितरण अधिकारी

# शेतकऱ्यांना दिलासा देणारी ‘मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना’

## 7.5 अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपाना मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यमानामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अशावेळी शेतकरी वर्गाला मदतीचा हात देऊन त्यांना दिलासा देण्यासाठी राज्यातील ७.५ एच.पी पर्यंतच्या शेती पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यासाठी ‘मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४’ राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मार्च २०२४ अखेर ४७ लाख ४१ हजार इतके कृषी पंप ग्राहक असून या ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. एकूण ग्राहकांपैकी १६ टक्के कृषीपंप ग्राहक असून ऊर्जेच्या एकूण वापरापैकी सुमारे ३० टक्के ऊर्जेचा वापर कृषी क्षेत्रासाठी होतो. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दश लक्ष युनिट आहेत. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषी पंपास वीज पुरवठा करण्यासाठी होतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या काळात १०/८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते.

जून २०२४ महिन्यात झालेल्या पावसाळी अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात ‘मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४’ राबविण्याची घोषणा केली होती. या योजनेद्वारे शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरविले असून राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरविण्यात येणार आहे. याकरीताता १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना मदत करण्याच्यादृष्टीने व त्यांची थकबाकी वाढू न देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्यात येत आहे.

ही योजना ५ वर्षासाठी राबविण्यात येणार असून त्याचा कालावधी एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत असणार आहे. मात्र ३ वर्षाच्या कालावधीनंतर सदर योजनेचा आढावा घेवूनच पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील ७.५ एच.पी पर्यंत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.



### 3 लाख 29 हजार 488 शेतीपंपधारक शेतकऱ्यांना लाभ

» राज्य शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ नुसार ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपाना मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३ लाख ८० हजार २०९ शेतीपंप आहेत. त्यापैकी ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या एकूण ३ लाख २९ हजार ४८८ शेतीपंपधारक शेतकऱ्यांना या मोफत वीज योजनेचा लाभ होणार आहे.’

### योजनेच्या अंमलबजावणीची पद्धत:-

» ‘मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना’ योजना महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येईल. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देवून त्यानुसार अनुदानीत वीज दर लागू करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर सदर वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येणार आहेत.

“ सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत ६ हजार ९८५ कोटी रुपये अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये ७ हजार ७७५ कोटी रुपये असे वार्षिक वीजदर सवलतीसाठी प्रतिवर्षी १४ हजार ७६० कोटी रुपये शासनाकडून महावितरण कंपनीला अदा करण्यात येणार आहे. मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याचे धोरण शासनाकडून ठरविण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वीजेची सुलभतेने उपलब्धता होऊ शकेल.

- राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल, पुणे

# शहरातील पोलीस ठाण्यांच्या आवारातील बेवारस वाहनांचा लिलाव

## शहारातील विविध पोलीस ठाणे आणि वाहतूक विभागात सुमारे 1,186 वाहनांचा समावेश : पोलीस प्रशानाची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पोलीस ठाण्यांच्या आवारात बेवारस पडलेल्या वाहनांचा आता लिलाव केला जाणार आहे. शहारातील विविध पोलीस ठाणे आणि वाहतूक विभागात अशी सुमारे १ हजार १८६ वाहने आहेत. यात दुचाकी, चारचाकीचा समावेश आहे. वाहन मालकांचा शोध घेऊनही सापडत नसल्याने ही प्रक्रिया केली जाणार आहे.

अपघात, चोरी तसेच फसवणुकीसह इतर काही प्रकरणात पोलिसांनी कारवाई केल्यानंतर अनेकदा संबंधित वाहने जप्त केली जातात. तर, वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनांवरही कारवाई केली जाते. दंडात्मक कारवाई करून अशी वाहने सोडून दिली जातात. मात्र, गंभीर प्रकरणात सदर वाहनांवर खटला दाखल करून ती जप्त केली जातात. या वाहनांवरील कार्यवाही पूर्ण करून वाहनधारकांनी संबंधित वाहन सोडून घेणे अपेक्षित असते. मात्र, जप्त केलेली अनेक वाहने वर्षानुवर्षे सोडवली जात नाहीत

त्यावरील कर, दंड भरला जात नाही. त्यामुळे ती वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात वर्षानुवर्षे पडून असतात. शहरात पोलीस ठाण्यांच्या आवारात अशी १ हजार १८६ वाहने आहेत. अनेक वाहने वर्षानुवर्षे एकाच जागेवर असल्याने कुजली आहेत. न्यायालयातून प्रकरण खारीज केल्यानंतरही नागरिक वाहने नेत नाहीत. यामुळे पोलीस स्टेशन आवारात जागा कमी पडत आहे. त्यामुळे पोलिसांकडून या वाहनांचा लिलाव केला जाणार आहे.



### ...15 दिवसांत अर्ज करावा

» पोलिसांनी शोध घेऊनही वाहनांचे मालक सापडले नाहीत. नागरिकांनी पाहणी करून कोणाचे वाहन असल्यास पुढील १५ दिवसांत संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांच्यासमक्ष उपस्थित राहून अर्जासह गाडीची मालकी हक्क दर्शवणारी कागदपत्रे सादर करून हक्क सिद्ध करावा. अन्यथा सदरची बिनधनी वाहने शासनाच्या स्वाधीन आहेत, असे समजून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ८५ (२) मधील अधिकारानुसार वाहने लिलावात विकली जाणार आहेत.

“ “संबंधित वाहने अनेक वर्षांपासून पोलीस ठाणे, वाहतूक विभागाच्या आवारात पडलेली आहेत. त्यांच्या मालकांचा शोध घेण्यात आलेला आहे. मात्र, ते मिळून आलेले नाहीत. त्यानुसार सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून वाहने लिलावाने विकण्यात येणार आहेत.”

- रोहिदास पवार, उपायुक्त, वाहतूक शाखा.